# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 27/04/2020 (सोमवार)

(सायंकाळ)

## विनयभंग

पो.स्टे. मौदा :– दिनांक 26/04/2020 चे 15.00 वा. ते 15.30 वा. दरम्यान आरोपी नामे– रत्नागीरी कोटाली, रा. भेंडाळा, ता. मौदा व 2 सोबती यांनी 40 वर्षीय पीडित/फिर्यादीच्या घरासमोर येउन फिर्यादीचे पतीस शिवीगाळ करून म्हटले की, 'तुझ्या गायीने माझ्या शेतातील मिरचीचे नुकसान केले' असे म्हणुन फिर्यादीचे पतीस व मुलास हातबुक्कीने मारहाण करीत असतांना फिर्यादी या भांडण सोडविण्यास मध्यस्ती गेल्या असता आरोपीतांनी पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम 354(अ), 323, 504, 506, 34 भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार देशमुख 9922447045 हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर मौजा दहेगाव जोशी येथे दिनांक 26/04/2020 चे 09.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सतिश युवराज चाके, वय 22 वर्ष, रा. दहेगाव जोशी व आरोपी क्र. 1) प्रविण विजय भुजाडे हे एकमेकांच्या शेजारी राहतात. फिर्यादी याने आरोपीस विचारले की, 'तु माझ्या परिवारासोबत भांडण का करते'. याकारणावरून आरोपी क्र. 2) विजय वडे याने फिर्यादीचे दोन्ही हात पकडुन ठेवले व आरोपी क्र 1. याने कुलरच्या पंख्या समोरील लोखंडी जाळीने फिर्यादीचे हनवटीवर व चेहयावर मारले त्यामुळे जबळयाचा मधला दांत थोडा तुटला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम 325, 34, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार संगिता कोवे 976602458 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर